**प्रेसनोट दिनांक २३/०८/२०१९**
**विश्रांतवाडी पोलीस स्टेशन पुणे**

**विषय :- भा.दं.वि. कलम ३७६,५०६ पॉस्को ॲक्ट कलम ३, ४, ११ सह १२ या गुन्हयातील आरोपीस २४ तासांचे आत अटक केले बाबत**

विश्रांतवाडी पो स्टे गुरनं २९१/२०१९ भा.दं.वि. कलम ३७६,५०६ पॉस्को ॲक्ट कलम ३, ४, ११ सह १२ या गुन्हयातील आरोपी नामे धनंजय मारपिल्ले रा. मुंजाबा वस्ती धानोरी पुणे याचा शोध घेणेकामी लोहगाव, वाघोली भागात पोना ७३३२ दुशिंग, पोशि ८४४१ देवकाते, पोशि १०२६७ खराडे असे १०.४५ वा. रवाना झाले होते. पोशि शेखर खराडे यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, आरोपी नामे धनंजय मारपिल्ले हा संतनगर, लोहगाव, पुणे येथे त्याचे बहीणीकडे येणार आहे. असे त्यांनी पो.हवा. ५४३२ सावंत यांना कळवीलेने ते पोलीस स्टेशन येथुन स्टाफसह लोहगाव येथे पोहचुन पोना ७३३२ दुशिंग, पोना ३८६४ भालचिम, पोशि १०२६७ खराडे, पोशि ८४४१ देवकाते, पोशि ९०८९ मोरे असे मिळून लोहगाव येथील संतनगरच्या अलीकडील स्मशानभुमी जवळ सापळा रचून थांबलो असता आरोपी नामे धनंजय हा पायी लोहगावकडून संतनगरकडे येताना दिसला तो स्मशानभुमी जवळ रस्त्यावर आला असता त्यास आम्ही पोलीस असल्याचा संशय आल्यानेतो आम्हास पाहुन पळू लागला त्यावेळी त्याचा पाठलाग करून त्यासशिताफीने २४ तासांचे आत पकडले आहे.

सदरची कारवाई मा. सुनिल फुलारी पुर्व प्रादेशिक विभाग, मा. प्रकाश अक्कानवरु पोलीसउप-आयुक्त परिमंडळ ४, मा. लक्ष्मण बोराटे सहा.पोलीस आयुक्तखडकी विभाग, मा. वपोनि अरूण आव्हाड, मा. पो.नि. रविंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली सदरची उल्लेखनीय कामगिरी ही तपास पथकाचे पोलीस कर्मचारी पोहवा विजय सावंत, यशवंत किरवे, प्रविण भालचिम, किशोर दुशींग, रिहान पठाण, प्रफुल्ल मोरे, शेखर खराडे, संदिप देवकाते यांनी उत्कृष्टरित्या कामगिरी पार पाडली आहे.